## नियमावली

१. स्पर्धकाचे वय २५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.
२. गतविजेत्या (प्रथम पारितोषिक प्राप्त) स्पर्धकांना स्पर्धेच्या त्या विभागात पुन्हा सहभागी होता येणार नाही.
३. वक्तृत्त्व स्पर्धेसाठी दोन वेगळ्या विषयावर बोलणाऱ्या स्पर्धकांचा संघ पाठवावा. संघासाठी प्रवेश शुल्क रू.२००/- राहील.
४. वाद-विवाद स्पर्धेतील संघात अनुकूल व प्रतिकूल बाजू मांडणाऱ्या दोन स्पर्धकांचा समावेश बंधनकारक राहील. संघासाठी प्रवेश शुल्क रू. २००/- राहील. तरच ते वैयक्तिक किंवा सांघिक पारितोषिकासाठी पात्र ठरतील.
५. स्पर्धकास एकूण १० मिनिटे (८+२) वेळ देण्यात येईल.
६. संयोजन समितीने निश्चित केलेल्या क्रमांकानेच स्पर्धकांना सहभागी व्हावे लागेल.
७. स्पर्धकांना प्रवेश अर्जात नमूद केलेले विषय ऐनवेळी बदलता येणार नाहीत.
८. सर्व स्पर्धांबाबत संयोजन समितीचा निर्णय अंतिम राहील.
९. स्पर्धकाने आपले रजिस्ट्रेशन ऑनलाईन पध्दतीने करावे त्यासाठी स्वतंत्र लिंक दिलेली आहे त्याचा वापर करावा.
१०. सहभागी महाविद्यालयाने स्पर्धक विद्यार्थ्याची ओळखपत्र पडताळणी करून स्पर्धेत निवड करताना रजिस्ट्रेशनच्या लिंकमध्ये ओळखपत्राची फोटो कॉपी अपलोड करावी. तसेच प्रत्यक्ष सहभागाच्या वेळी ही सर्व कागदपत्रे सादर करावी.

## सहभाग पत्र

आपल्या संघाच्या सहभागाचे पत्र प्राचार्यांच्या सहीने खालील दिलेल्या लिंकवर सर्व आवश्यक माहिती भरून शनिवार, दिनांक १७ सप्टेंबर २०२२ पर्यंत पाठवावे.

**टीप :** सर्व सहभागी संघांनी नोंद घ्यावी की, विजेत्या स्पर्धकांना फिरत्या ढाली त्यांच्या महाविद्यालयाला सुपूर्त कराव्या लागतील व त्यासाठी अनामत रक्कम प्रत्येकी रू. २०००/- जमा करावी लागेल. ढाली नेणे व वेळेवर परत करण्याची जबाबदारी सर्वस्वी त्या महाविद्यालयाची राहील व तसे हमीपत्र द्यावे लागेल.

**Registration link - https://forms.gle/i3qMmEsmkkgCD6i9A**

**संपर्क : ८४२१८०३६८५ / ८१४९०४९६६०**

बुक-पोस्ट

सस्नेह निमंत्रण

प्रति, ............................................

............................................

............................................


• प्रेषक •

**मा. प्राचार्य**

तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
बारामती, ता. बारामती - ४१३ १०२, जि. पुणे.
फोन : ०२११२-२२२४०५ फॅक्स : ०२११२-२२२७२८
E-Mail : principal.tccollege@gmail.com


अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती जि. पुणे

**स्वायत्त**

• नॅक पुनर्मूल्यांकन 'ए+' (सीजीपीए ३.५५) २०१७•
• उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार २०१७ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ•
• उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार २०१७ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ•
• उच्च क्षमताशील महाविद्यालय २०१६ यु.जी.सी., नवी दिल्ली•
• उत्कृष्ट एन.एस.एस. पुरस्कार २०१६ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ•
• स्टार महाविद्यालय योजना २०१६ डी.बी.टी.•
• फिस्ट योजना २०१३ डी.एस.टी.•

आणि

## बारामती नगर परिषद, बारामती

द्वारा आयोजित

# कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्त्व व वादविवाद स्पर्धा २०२२

शुक्रवार, दि.२३/९/२०२२ शनिवार, दि.२४/९/२०२२



वर्ष ४९ वे

**डॉ.शशांक माने**
कार्याध्यक्ष
भ्रमणभाष : ९७६३८६५५५६

**डॉ.चंद्रशेखर मुरुमकर**
प्राचार्य



# कविवर्य मोरोपंत

## वक्तृत्त्व व वाद-विवाद स्पर्धेचे आजपर्यंतचे काही विजेते मानकरी

* देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद
* राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर
* गरवारे महाविद्यालय, पुणे
* महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अकलूज
* एच.पी.टी. महाविद्यालय, नाशिक
* कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, इस्लामपूर
* लॉ कॉलेज, पुणे

## वक्तृत्त्व स्पर्धा

### कनिष्ठ महाविद्यालय

शुक्रवार, दि.२३ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ९ वाजता

**विषय**

१. मोरोपंतांच्या काव्यातील प्रासादिकता
२. आचार्य १०८ श्री शांतीसागर महाराजांचे सामाजिक योगदान
३. शांता शेळके : मराठीतील सांस्कृतिक लेणे
४. युद्धामागील अर्थकारण
५. .... तरीही, मला राजकारणात यायचंय
६. आजचे मनोरंजन : व्यवसाय की प्रबोधन

### वरिष्ठ महाविद्यालय

शुक्रवार, दि.२३ सप्टेंबर २०२२ रोजी दुपारी १२.००वाजता

**विषय**

१. पंडिती काव्यातील मोरोपंतांचे स्थान
२. जैन मुनी : अपरिग्रहतत्वाचे सर्वश्रेष्ठ आदर्श
३. 'जी. ए. कुलकर्णी' : एक गूढ प्रवासी
४. संविधान प्रबोधन : काळाची गरज
५. महासत्तांचा नवसाम्राज्यवाद
६. आजचे जाहिरात युग : आभासी सत्याचे प्रखर वास्तव
७. आजची स्त्री - मला काही सांगायचंय

## वाद-विवाद स्पर्धा

शनिवार, दि.२४ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ९.०० वाजता

### प्रस्ताव

"आजही भारतीयांत लोकशाही मुरलेली आहे"

## उत्स्फूर्त वक्तृत्त्व स्पर्धा

शनिवार, दि.२४ सप्टेंबर २०२२ रोजी सायं. ४.०० वाजता.

## पारितोषिक वितरण समारंभ

शनिवार, दि.२४ सप्टेंबर २०२२ रोजी सायं. ५.३० वाजता.



## कविवर्य मोरोपंत (१७२९-९४)

साक्षात सरस्वतीचे वरदान लाभलेले मोरोपंत, पंडिती काव्यप्रकारातील सर्वश्रेष्ठ कवी म्हणून ओळखले जातात. सन १७५३ मध्ये मोरोपंत पन्हाळगडाहून बारामतीस श्रीमंत बाबूजी नाईकांकडे आले. बारामतीत स्थिरता मिळाल्यानंतर त्यांनी 'आर्याभारत', 'हरिवंश', 'मंत्रभागवत', व 'कृष्णविजय' इ. ग्रंथ लिहिले. आपल्या कार्यकाळात मोरोपंतांनी ७५ हजारांहून अधिक आर्या रचल्या, १०८ रामायणांचे लिखाण केले तसेच अनेक संतांवर स्तुतीपर पद्ये लिहिली.

मोरोपंतांच्या कार्याचा गौरव व्हावा व येणाऱ्या पिढीला त्यांच्या लिखाणाची ओळख व्हावी या उद्देशाने सन १९७२-७३ साली बारामती नगरपरिषद व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोरोपंतांच्या नावे वाद-विवाद व वक्तृत्त्व स्पर्धा आयोजित करण्यास शुभारंभ केला. तेंव्हापासून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय दरवर्षी या स्पर्धेचे यशस्वीरित्या आयोजन करीत आहे. सन २०२२-२३ हे या स्पर्धेचे ४९ वे वर्ष आहे. संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिध्द असलेल्या या स्पर्धेतून आजपावेतो अनेक नामवंत वाक्पटू तयार झालेले आहेत. ही राज्यस्तरीय स्पर्धा जिंकणे म्हणजे आपल्या वाद-विवाद व वक्तृत्त्व कलेला 'सर्वोत्कृष्ठतेचा किताब' मिळणे असे आज समीकरणच झाले आहे. करोना महामारीनंतर प्रत्यक्ष सभागृहात ही स्पर्धा आयोजित करताना महाविद्यालयास विशेष आनंद होत आहे.

## पारितोषिके

१. वक्तृत्व व वाद-विवाद स्पर्धांसाठी दोन स्वतंत्र फिरत्या ढाली.
२. मोरोपंतांच्या विषयावर प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या स्पर्धकास विशेष पारितोषिक व स्वतंत्र फिरती ढाल.
३. उत्स्फूर्त वक्तृत्त्व स्पर्धेसाठी स्वतंत्र फिरती ढाल.
४. मान्यवरांनी विविध विषयांवर जाहीर केलेली अनेक वैयक्तिक रोख बक्षीसे.